**समरी फौजदारी केस नं. १०/२०२४**
निशाणी नंबर –

## आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन

**आरोपीचे नाव – अकबर बख्तावर मोमीन,**
वय – 60 वर्षे, व्यवसाय – बिझनेस,
राहणार– मिरज, सांगली

प्रश्न १ तुम्हांला कळविण्यात येते की, मी आता विचारणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देण्यास तुम्ही कायदेशीररीत्या बांधील नाही. तुम्ही उत्तरे देण्यास नकार देऊ शकता. तुम्ही उत्तर देण्यास नकार दिला अथवा चुकीचे उत्तर दिल्यास तुम्हांला शिक्षा होणार नाही. पण तुमच्याविरुद्ध गुन्ह्यात सामील होणारी विधाने विचारात घेतली जातील हे तुम्हांला समजले आहे काय ?

उत्तर – होय.

प्रश्न २ फिर्यादी अश्विन विजयराव पवार यांचे पुराव्यात असे आले आहे की, त्यांचे व तुमचे गेल्या वीस ते पंचवीस वर्षापासून घरोब्याचे व मैत्रीचे असे घनिष्ठ संबंध आहेत, तसेच एकमेकांचा चांगली परिचय व ओळख आहे, तसेच त्यांचे व तुमचे एकमेकांच्या घरी वारंवार येणे जाणे असते. याबाबत तुम्हांला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर – हे खरे आहे.

प्रश्न ३ त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तुमचे घरगुती आर्थिक अडचणीमुळे व दवाखान्याच्या कारणासाठी तुम्ही त्यांच्याकडे एकूण रक्कम रू. ३०,००,०००/– इतक्या रक्कमेची मागणी एप्रिल २०२० मध्ये केली होती. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर – हे खोटे आहे

प्रश्न ४ त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यांनी तुमची कौटुंबिक व दवाखान्याची गरज भागवी म्हणून तुम्हाला दि. ०४.०७.२०२० रोजी

त्यांचे सांगली अर्बन बँक शाखा माधवनगर मधील सेव्हींग खाते क्र. ११८७५ रक्कम रू. १६,००,०००/- आर.टी.जी.एस. द्वारे तुम्हाला दिलेले आहेत. याबाबत तुम्हांला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर - हे खरे आहे.

प्रश्न ५ त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तसेच तुम्हाला सन २०२० मध्ये कोरोना साथीचा प्रादुर्भाव झाला होता, त्यामुळे तुम्ही बरेच दिवस हॉस्पिटलमध्ये उपचार घेतलेले आहेत. त्यासाठी हॉस्पिटल व मेडिकलचे औषधांचे बिल यासाठी तुम्हाला मोठ्या रक्कमेची गरज होती. याबाबत तुम्हांला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर - हे खोटे आहे.

प्रश्न ६ त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तुमची स्थिती व गरज पाहून त्यांनी तुम्हाला वेळोवेळी डिसेंबर २०२० अखेर रोखीने रक्कम रू. १४,००,०००/- दिलेले आहेत. याबाबत तुम्हांला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर - हे खोटे आहे.

प्रश्न ७ त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, सदरच्या दोन्ही रक्कमा तुम्ही स्वीकारल्या आहेत. याबाबत तुम्हांला काय सांगावयाचे आहे?

उत्तर - हे खोटे आहे.

प्रश्न ८ त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, सदरची रक्कम तुम्ही त्यांना तीन महिन्याच्या आत म्हणजेच ३१ मार्च २०२१ अखेर परत करेन अशी हमी दिली होती. याबाबत तुम्हांला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर - हे खोटे आहे.

प्रश्न ९ त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यानंतर तीन महिने पूर्ण झाल्यानंतर त्यांनी तुमच्याकडे दिलेल्या रक्कमेची मागणी केली असता तुम्ही थोडी मुदत द्या अशी त्यांना विनंती केली. याबाबत तुम्हांला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर - हे खोटे आहे.

प्रश्न १० त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्याप्रमाणे ते तुमच्या अडचणी व सबबीनुसार ऑक्टोबर २०२३ पर्यंत थांबले होते. याबाबत तुम्हांला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर - हे खोटे आहे.

प्रश्न ११ त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तथापि सदर कालावधीमध्ये देखील तुम्ही त्यांची रक्कमेची परतफेड केली नाही. याबाबत तुम्हांला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर - हे खरे आहे.

प्रश्न १२ त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यांनी तुमच्याकडे वारंवार दिलेल्या रक्कमेची मागणी केली असता तुम्ही तुमचे खाते असलेली सारस्वत बँक शाखा लक्ष्मी मार्केट, मिरज यांचेकडील दि. ०६.११.२०२३ रोजीचा धनादेश क्र. ००९६६८ रक्कम रू. ३०,००,०००/- चा धनादेश निशाणी २२ वरील दिला. याबाबत तुम्हांला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर - हे खोटे आहे. मी फिर्यादी यांना कोरा धनादेश दिला होता.

प्रश्न १३ त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तसेच सदरील धनादेश तारखेस अगर तद्नंतर वटणेची हमी देखील तुम्ही त्यांना धनादेश देतेवेळी दिली होती. याबाबत तुम्हांला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर - हे खोटे आहे.

प्रश्न १४ त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तुमच्यावर विश्वास ठेऊन त्यांनी सदरचा धनादेश वटण्याकरिता त्यांचे सांगली अर्बन को.ऑ. बँक लि. माधवनगर कडील खात्यावर दि. ०६.११.२०२३ रोजी दिला असता तो फंडस इनसफिशिएंट असा शेरा नमूद होऊन न वटता मूळ मेमो आर्टिकल 'अ' प्रमाणे परत आला. याबाबत तुम्हांला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर - हे खोटे आहे.

प्रश्न १५ त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांनी त्यांचे वकील श्री नामदेव यशवंत पाटील, रा. बुधगांव, ता. मिरज जि. सांगली यांचेमार्फत तुम्हाला दि. २८.११.२०२३ रोजी रजि.ए.डी.ने तुमच्या पत्त्यावर रक्कम मागणी नोटीस निशाणी २३ वरील पाठवली, तसेच त्याची पोस्टल पावती आर्टिकल 'बी' वरील अभिलेखावर दाखल आहे. याबाबत तुम्हांला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर – हे खरे आहे.

प्रश्न १६ त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, सदरील नोटीस तुम्हाला दि. २९.११.२०२३ रोजी मिळाली, त्याची मूळ पोहोच पावती आर्टिकल सी प्रमाणे अभिलेखावर दाखल आहे. याबाबत तुम्हांला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर – हे खरे आहे.

प्रश्न १७ त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तथापि, त्यांनी पाठवलेली नोटीस तुम्हाला मिळून देखील तुम्ही मुदतीत त्यांची धनादेशाची देय रक्कम अदा केली नाही व खोट्या मजकुराची व आशयाची उत्तरी नोटीस दि. ०७.१२.२०२३ रोजी ॲड. वृषभनाथ उदगावे, मिरज यांच्यामार्फत त्यांना पाठविली. याबाबत तुम्हांला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर – हे खरे आहे की मी नोटीस पाठवली होती.

प्रश्न १८ त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, अशा प्रकारे तुम्ही त्यांना जाणूनबुजून न वटणारा धनादेश देऊन त्यांची फसवणूक केली आहे व दि निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट मधील तरतुदीप्रमाणे फौजदारी स्वरूपाचा गुन्हा केला आहे. याबाबत तुम्हांला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर – हे खोटे आहे.

प्रश्न १९ वरील फिर्यादी हे तुमच्या विरुद्ध साक्ष का देत आहे ?

उत्तर – मला माहिती नाही.

प्रश्न २० तुम्ही शपथेवर जबाब देणार आहात का ?

उत्तर – आहे

प्रश्न २१ तुम्हांला तुमच्या बचावासाठी आणखी काही साक्षीदार तपासायचे आहेत का ?

उत्तर – नाही.

प्रश्न २२ तुम्हाला या केसबद्दल आणखी काही सांगावयाचे आहे का ?

उत्तर – मी फिर्यादीला केवळ रक्कम रु. १६,००,०००/- देणे लागतो. व ते मी देण्यास तयार आहे. मात्र फिर्यादी मागत असलेली रक्कम २.३० लाख मी देण्यास तयार नाही.

(आरोपीची सही)

माझे समक्ष,

०३/०१/२६.

(रोहिणी स. पाटील)

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (कोर्ट क्र.१),

सांगली.

## प्रमाणपत्र

असे प्रमाणित करणेत येते की, सदरचे निवेदन हे माझे समक्ष घेतले असून ते आरोपीच्या सांगण्याप्रमाणे खरे व बरोबर नोंदविणेत आले आहे.

माझे समक्ष,

०३/०१/२६.

(रोहिणी स. पाटील)

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (कोर्ट क्र.१),

सांगली.

**दिनांक – ०३/०१/२०२६.**

**ठिकाण – सांगली.**